**परिपत्रक क्र. ४७ /ज्युनियर आस्थापना**

**उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये , व्यवसाय शिक्षण, तांत्रिक विभाग/ आश्रमशाळा विभागाकडील दि. १०/१२/२०१६ ची शाखा माहिती ऑनलाईन पाठविणे बाबत....**

# रयत शिक्षण संस्था, सातारा

**उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये ,**
**व्यवसाय शिक्षण, तांत्रिक विभाग, आश्रमशाळा**
**परिपत्र क्र. ४७ दिनांक २०/१२/२०१६**
**महत्वाचे व कालमर्यादित**

प्रति,

शाखाप्रमुख,

उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये ,

व्यवसाय शिक्षण, तांत्रिक विभाग, आश्रमशाळा

रयत शिक्षण संस्था

विषय : **दि.१०/१२/२०१६ ची शाखा माहिती ऑनलाइन पाठविणेबाबत . .**

**संदर्भ :** आमचेकडील गतवर्षीचे क्र. ५१ दि.३१/१२/२०१५ चे परिपत्रक.

गतवर्षीच्या उपरोक्त विषय संदर्भ परिपत्रकानुसार आपणास कळविण्यात येते की, गतवर्षी दि.१०/१२/२०१५ ची शाखा माहिती ऑनलाइन भरावी व एक प्रत संस्था कार्यालयास पाठवावी असे कळविलेले होते. त्याप्रमाणेच दि.१०/१२/२०१६ ची शाखा माहिती ऑनलाइन भरून एक प्रत संस्था कार्यालयास पाठविणे अनिवार्य आहे. ज्या शाखांनी गतवर्षी ऑनलाइन माहिती संगणकात भरली आहे ती तशीच संगणकात ठेवावी व त्या खाली दि.१०/१२/२०१६ ची शाखा माहिती स्वतंत्रपणे ऑनलाइन संगणकात भरावी. गतवर्षीची माहिती Edit करू नये.

तरी आपण दि.१०/१२/२०१६ ची उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये , व्यवसाय शिक्षण, तांत्रिक विभाग, आश्रमशाळा यांची शाखा माहिती संगणकात ऑनलाइन भरून दि.१०/०१/२०१७ पूर्वी मिळेल अशारितीने न चुकता पाठवावी. या बाबीस विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी. ऑनलाइन माहिती पाठविण्यास एखाद्या लिपिकाने टाळाटाळ केल्यास अगर न पाठविल्यास त्यास

जबाबदार धरून पुढील कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी. सदरची माहिती ऑनलाइन भरण्यासाठी खालील मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून संगणकात ऑनलाइन माहिती भरावी.

तसेच ऑनलाइन माहितीची संगणकातून प्रिंट काढून त्याचे संस्थेच्या मुख्य कार्यालयात पुस्तक तयार केले जाणार आहे. त्यासाठी दोन प्रती प्रिंट काढून १ प्रत स्थळ परत म्हणून शाखेकडे ठेवून एक प्रत संस्था कार्यालयाकडे वरील मुदतीत पाठवावी.

गतवर्षी सदरची माहिती काही उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये , व्यवसाय शिक्षण, तांत्रिक विभाग, आश्रमशाळा ऑनलाइन भरली नाही. वेळोवेळी स्मरणपत्र पाठवूनही पूर्तता झाली नाही. यावर्षी असे घडू नये, याची संबंधितानी नोंद घ्यावी. वर नमूद केलेल्या तारखेपूर्वी न चुकता पूर्तता होईल, याची दक्षता घ्यावी.

ऑनलाईन शाखा माहिती भरण्याची पद्धत पुढीलप्रमाणे :-

**www.rayatshikshan.edu** या संस्थेच्या वेबसाईटवरील शाखा माहिती या मेनूमध्ये जावून 'शाखा माहिती ऑनलाईन प्रणाली' यावर क्लिक करावे. त्यानंतर शाखा माहितीचे होम पेज ओपन होईल. या होम पेजवर विविध शाखा प्रकाराच्या नावाने आयकॉन दिसतील. शाखा माहिती भरण्यासाठी या आयकॉनवर क्लिक करून लॉग इन करावे लागते. आपल्या शाखेमध्ये लॉगइन होण्यासाठी शाखाकोड व पासवर्ड आवश्यक आहे. यासाठी पुढे दिलेल्या क्रमाने शाखा कोड व पासवर्ड शोधता येतो.

- होम पेज वरील 'शाखा कोड शोधा' यावर क्लिक करावे.
- शाखेचा कोड शोधण्यासाठी पुढील क्रमाने सर्च करावे.
  विभाग निवडा → जिल्हा निवडा →तालुका निवडा → शाखा प्रकार निवडा व शोधा या बटनावर क्लिक करून महाविद्यालयाचे नाव व शाखा कोड पहावा. तोच शाखा कोड लॉग इन करण्यासाठी वापरावा.(पासवर्ड वापरावा)
- होम पेजवर येण्यासाठी (होम)  बटनावर क्लिक करा. त्यानुसार खालीलप्रमाणे होमपेज दिसेल. आपणास ज्या शाखाप्रकारची माहिती भरावयाची आहे त्या शाखाप्रकारच्या नावाच्या आयकॉन वर क्लिक करावे.

होम पेज




होम पेज शाखाप्रकारानुसार शाखा माहिती भरणे:-

- **<u>उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये</u>** – हायस्कूल व महाविद्यालये यांना जोडून असणा-या कनिष्ठ महाविद्यालयां ची शाखा माहिती फॉर्म येथे भरणे.
- **<u>एम.सी.व्ही.सी</u>.**- ज्या शाखांमध्ये किमान कौशल्य व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु असतील त्या शाखांनी येथे शाखा माहिती भरावी.
- **<u>टेक्निकल</u>** - हायस्कूल व महाविद्यालये यांना जोडून असणा-या तांत्रिक अभ्यासक्रमांची शाखा माहिती फॉर्म येथे भरणे.
- **<u>पूर्व व्यवसायिक तांत्रिक अभ्यासक्रम</u>** - हायस्कूल व महाविद्यालये यांना जोडून असणा-या पूर्व व्यवसायिक तांत्रिक अभ्यासक्रमांची शाखा माहिती फॉर्म येथे भरणे.
- **<u>आश्रमशाळा</u>** – आश्रमशाळांची शाखा माहिती फॉर्म येथे भरणे.
- शाखा कोड शोधा- वरील प्रत्येक विभागामध्ये लॉग इन करण्यासाठी शाखेचा कोड आवश्यक आहे. सदर शाखाकोड हाच पासवर्ड असून तो शोधण्यासाठी खालील स्क्रीन आहे.

## शाखा कोड शोधा




## लॉग इन स्क्रीन




- लॉग इन स्क्रीनमध्ये
  - विभाग निवडा
  - जिल्हा निवडा
  - तालुका निवडा
  - शाखेचा कोड निवडावा (वर सर्च केलेला)
  - तोच कोड पासवर्ड म्हणून टाईप करावा.
  - **Log in** या बटनावर क्लिक करावे.

*(सूचना- उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय या शाखा प्रकारामध्ये अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित या तिन्हीसाठी वेगवेगळा फॉर्म भरणे आवश्यक आहे. यासाठी लॉग इन स्क्रीन मध्ये हे तीन पर्याय उपलब्ध करून दिलेले आहेत.*
*उदा. एखाद्या शाखेमध्ये वरील तीनही प्रकार असतील त्यांनी आपल्या शाखेची माहिती तिन्ही प्रकाराची वेगवेगळी पूर्णपणे भरणे आवश्यक आहे.)*

लॉग इन नंतर आलेल्या स्क्रीनवर डाव्या बाजूला भाग पहिला, भाग दुसरा व भाग तिसरा असे मेनू येतील. या मेनूच्या लिस्ट नुसार दिलेल्या क्रमानेच माहिती भरावी.

भाग पहिला




उदा.

- <u>महाविद्यालय माहिती -</u>

दिलेली सर्व माहिती भरल्यानंतर जतन या बटनावर क्लिक करा म्हणजे माहिती सेव्ह होईल.

- <u>विद्यार्थ्यांची वर्गवार माहिती-</u>

नवीन विद्यार्थ्यांची इयत्तावार माहिती यावर क्लिक करून नवीन माहिती भरता येते.
प्रथम दिनांक सिलेक्ट करावा.  *(सर्व फॉर्मवरील तारीख एकच राहील याची काळजी घ्यावी.)*
लिस्ट मधील कला, वाणिज्य, शास्त्र इत्यादी प्रकारानुसार प्रत्येकाची माहिती खालीलप्रमाणे भरावी.

शाखेमध्ये चालू असणा-या प्रत्येक Branch ची विद्यार्थी संख्या भरून Add या बटनावर क्लिक करावे. अशी सर्व Branch ची माहिती एका खाली एक भरून झाल्यावर जतन करा या बटनावर क्लिक करावे. म्हणजे सर्व माहिती सेव्ह होईल.

# विद्यार्थी इयत्तावार माहिती




याचप्रमाणे स्क्रीनवरील डावीकडे असणारे (शाखा माहिती - भाग पहिला, भाग दुसरा, भाग तिसरा) क्रमाने सर्व पर्याय क्लिक करून प्रत्येक स्क्रीन वरील माहिती भरण्यासाठी नवीन..... या नावाच्या बटनावर क्लिक करा. माहिती भरून झाल्यावर जतन करा या बटनावर क्लिक करावे. अशा पद्धतीने शाखा माहितीचे सर्व फॉर्म भरावेत.

सेव्ह केलेल्या माहितीमध्ये बदल करायचा असल्यास...:

१. उपलब्ध माहिती या बटनावर क्लिक करावे.
२. Edit वर क्लिक करून ज्या माहितीमध्ये बदल करावयाचा आहे तो बदल करावा.
३. Add या बटनावर क्लिक करावे. त्यानंतर ज्या माहितीमध्ये बदल केलेला आहे. त्या माहितीच्या समोर Update वर क्लिक करावे.
४. बदल करा या बटनावर क्लिक करावे.
5. पुन्हा उपलब्ध माहिती या बटनावर क्लिक करून Update वर क्लिक करावे. याप्रमाणे बदल केलेली माहिती सेव्ह होईल.

- माहिती भरण्यामध्ये काही अडचणी असल्यास Contact us मध्ये दिलेल्या संस्थेच्या संगणक विभागातील **श्री. महेंद्र देसाई** यांच्याशी संपर्क करावा.

(प्रिं.डॉ.डी.डी.पाटील)
**सहसचिव (उ.शि.),**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

प्रत माहितीसाठी

- विभागीय अधिकारी,मध्य विभाग,दक्षिण विभाग,उत्तर विभाग,पश्चिम विभाग, रायगड विभाग
- प्रकल्प अधिकारी, आदिवासी आश्रमशाळा विभाग, रयत शिक्षण संस्था,मोखाडा.
- ऑडिटर, रयत शिक्षण संस्था,सातारा.